आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र – दुपारी ३.०० वाजता

९ ऑक्टोबर २०२३ –सोमवार

<><><><><><>

राष्ट्रवादी काँग्रेसच्या आमदारांच्या अपात्रेबाबत जयंत पाटील यांची याचिका आणि शिवसेनेच्या आमदारांच्या अपात्रतेविषयी उद्धव ठाकरे यांची याचिका एकत्र करण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायलयानं विधानसभा अध्यक्षांना दिले आहेत. अपात्रतेबाबत विधानसभा अध्यक्ष वेळकाढूपणा करत असल्याचा आरोप करणारी याचिका राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी सर्वोच्च न्यायालयात दाखल केली होती. त्यावर  सर्वोच्च न्यायालयानं आज हे निर्देश दिले. विधानसभा अध्यक्षांना जुलै महिन्यात निवेदन दिल्यानंतर दोनदा स्मरणपत्र पाठवूनही फुटीर आमदारांना अध्यक्षांनी जबाब नोंदवण्यासाठी बोलावलं नाही, असा आरोप याचिकेत करण्यात आला आहे. या प्रकरणी आता येत्या 13 ऑक्टोबरला सुनावणी होणार आहे.

<><><><><><>

मानवतेच्या दृष्टीकोनातून लवचिक अन्न प्रणाली तयार करण्यावर भर दिला पाहिजे आणि हवामान बदलामुळे निर्माण झालेल्या आव्हानांचा सामना करण्यासाठी वेगानं कृती केली पाहिजे असं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी म्हटलं आहे. नवी दिल्लीत न्याय्य अन्न प्रणालीशी संबंधित कृषी  परिषदेत त्या बोलत होत्या.
कृषी उत्पादनातल्या निर्णय प्रक्रियेत महिलाच्या सहभागाला चालना देण्याची गरज असल्याचं त्या म्हणाल्या. त्यांनी जैव विविधतेचं महत्त्व त्यांनी विशद केलं. अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या हितासाठी सरकारनं राबवलेल्या उपाययोजनांमुळे गेल्या काही वर्षात अन्नधान्य उत्पादनात  लक्षणीय वाढ झाली आहे, असं कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्री नरेंद्र सिंग तोमर यांनी सांगितलं.

<><><><><><>

निवडणूक आयोगानं आज राजस्थान, मध्य प्रदेश, तेलंगणा, छत्तीसगढ आणि मिझोरम या पाच राज्यांमधल्या विधानसभा निवडणुकांची घोषणा केली. राजस्थानमध्ये २३ नोव्हेंबरला मतदान होईल. मध्य प्रदेशमध्ये १७ नोव्हेंबरला, तेलंगणा मध्ये ३० नोव्हेंबरला, छत्तीसगढ मध्ये सात आणि १७ नोव्हेंबरला, तर मिझोराम मध्ये सात नोव्हेंबरला मतदान होणार आहे. या सर्व राज्यांमध्ये तीन डिसेंबरला मतमोजणी होणार असल्याचं मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी सांगितलं.

**<><><><><>**

देशातल्या सर्व अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्थांमध्ये लवकरंच समर्पित आयुष अकादमी सुरू करण्याची घोषणा केंद्रीय आयुषमंत्री सर्बानंद सोनोवाल यांनी केली. ते आज मुंबईत आयुष अभियानाच्या विभागीय आढावा बैठकीत बोलत होते. देशातल्या नागरिकांना प्रत्येक स्तरावरील आधुनिक आणि पारंपारिक औषधोपचार पद्धती उपलब्ध असावी, यासाठी केंद्र सरकारकडून विशेष अभियान राबवलं जाणार आहे. कोरोना काळात आयुष उपचार पद्धतीचं महत्त्व सर्व जगाला पटलं, असं ते म्हणाले. जागतिक आरोग्य संघटना आणि आयुष मंत्रालय गुजरात मधल्या गांधीनगर इथं पारंपारिक औषधोपचार पद्धतीवर दोन दिवसीय परिसंवादाचं संयुक्तरित्या आयोजन करणार असल्याची माहिती त्यांनी दिली. यावेळी महाराष्ट्र, गुजरात, राजस्थान, अंदमान निकोबार आदी राज्यातले प्रतिनिधी उपस्थित होते.

**<><><><><>**

मेरी माटी मेरा देश या अभियानाअंतर्गत आज नाशिक जिल्ह्यातल्या दिंडोरी तालुक्यात अमृत कलश यात्रेचं आयोजन करण्यात आलं होतं. यावेळी केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री डॉ. भारती पवार उपस्थित होत्या. केंद्र आणि राज्य सरकारच्या

योजना सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी प्रयत्न करावेेत असं आवाहन त्यांनी केलं. यावेळी उपस्थित समूहाला पंचप्रण शपथ देण्यात आली.

**<><><><><>**

केंद्रीय पर्यटन मंत्री जी. किशन रेड्डी यांनी आज सिकंदराबाद स्थानकावर काझीपेठ ते हडपसर एक्स्प्रेस, बोधन-करीमनगर, रायचूर-नांदेड विस्तारित गाड्यांबरोबरच कुर्नूल-जयपूर विस्तारित ट्रेनलाही हिरवा झेंडा दाखवला. तेलंगणातल्या सर्व प्रमुख शहरांमध्ये रेल्वे सेवांचा विस्तार करण्यासाठी केंद्र सरकार वचनबद्ध असल्याचं ते म्हणाले, चेर्लापल्ली रेल्वे स्थानक येत्या जानेवारीपर्यंत तयार होणार असल्यांचं देखील त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

कोकण रेल्वेवर कडवईपासून रत्नागिरीपर्यंतच्या रेल्वेमार्गावर उद्या सकाळी सात वाजून ४० मिनिटांपासून तीन तासांचा मेगा ब्लॉक घेतला जाणार असल्याचं कोकण रेल्वे प्रशासनानं प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळवलं आहे. देखभाल-दुरुस्तीच्या कामासाठीच्या या ब्लॉकमुळे तीन गाड्या विलंबानं धावणार आहेत. त्यात आज सुटणारी तिरुनेलवेली-जामनगर एक्स्प्रेस ठोकूर ते रत्नागिरीदरम्यान तीन तास थांबवली जाणार आहे. तसंच आजच सुटणारी तिरुअनंतपुरम-लोकमान्य टिळक टर्मिनस नेत्रावती एक्स्प्रेस ठोकूर ते रत्नागिरीदरम्यान दीड तास थांबवली जाणार आहे. तसंच, उद्या सकाळी सुटणारी मुंबई-मडगाव जनशताब्दी एक्स्प्रेस खेड-चिपळूणदरम्यान २० मिनिटं थांबवली जाणार आहे.

**<><><><><>**

एकदिवसीय विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत आज हैदराबाद इथं नेदरलँड आणि न्यूझीलंड यांच्यात सामना सुरु आहे. नेदरलँडनं, नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा न्यूझीलंडच्या 15 षटकात 1 बाद 82 धावा झाल्या होत्या.

या स्पर्धेत काल चेन्नई इथं झालेल्या सामन्यात भारतानं ऑस्ट्रेलियावर ६ गडी राखून विजय मिळवला. प्रथम फलंदाजी करताना ऑस्ट्रेलियानं सर्व गडी गमावून १९९ धावा केल्या होत्या. भारतानं चार गड्यांच्या मोबदल्या ४२ व्या षटकातच विजयी लक्ष्य पार केलं. के. एल राहुलच्या नाबाद ९७, आणि विराट कोहलीच्या ८५ धावांमुळे भारताचा विजय सुकर झाला.

//<><><><><><>//